कि.फौ.अर्ज नं. ४१९/२०२२.

निशाणी क्र. १ खाली

**अर्जदाराचा फौ.प्र.सं. कलम २०० प्रमाणे इश्युप्रोसेस पुर्वीचा प्रतिज्ञापुर्वक पुरावा/सत्यापन.**

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | | | |
|---|---|---|---|
| माझे नांव | : **भारत सदाशिव सांगळे** | | |
| माझे वय | : ४८ वर्षे | व्यवसाय | : शेती |
| राहणार | : बोरगांव ध. | तालुका | : कळंब |
| जिल्हा | : उस्मानाबाद. | | |

घटना दिनांक ०५/१२/२०२२ रोजी सायंकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास मौजे बोरगांव ध. येथील बालाजी सांगळे यांच्या टपरी समोर घडली होती. त्यावेळी मी त्या टपरीवर पान खाण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी गैरअर्जदार दिलीप सांगळे हा तेथे आला. त्याने मला विद्युत रोहीत्र गावात बसवायचे आहे यासाठी ५,०००/– रुपयांची वर्गणी मागीतली. मी त्यास सांगीतले की, ज्या ठिकाणी रोहीत्र बसवायचे आहे त्या वरुन माझे विद्युत जोडणी नाही. त्यामुळे मी पैसे देणार नाही. त्यावर तो मला म्हणाला की, त्या विद्युत खांबावर तुमच्या शेतातील लाईट सुरू असतो. त्यामुळे त्यासाठी तुम्हाला पैसे द्यावेच लागतील. मी त्यास नकार दिला. त्यावरुन त्याने मला पैसे तर द्यावेच लागतील तु कसा देत नाही असे म्हणून त्याने मला शिवीगाळ केली. त्याने मला शिवीगाळ करुन म्हटले की, तुझ्या शेतातील विद्युत खांब उपटून टाकीन. गैरअर्जदाराने मला गच्ची पकडून जिवे मारण्याची धमकी दिली होती. साक्षीदार बालाजी सांगळे व आकाश सांगळे यांनी मला गैरअर्जदाराच्या तावडीतुन सोडवले होते. त्यानंतर मी पोलीस ठाणे वाशी येथे तक्रार दिली होती. परंतु, त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे मी प्रस्तुत फिर्याद दाखल केली आहे. या व्यतिरीक्त प्रस्तुत प्रकरणा विषयी मला काहीही सांगणे नाही.

सा.वा. दा.ब.अ.क.के.

फिर्यादीची सही

समक्ष

RAVINDRA PRALHAD BATHE Digitally signed by RAVINDRA PRALHAD BATHE Date: 2023.01.31 17:04:40 +0530

दिनांक 31 / 01 / 2023.

**(आर.पी.बाठे)**

न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग कळंब.